# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** गोकुळ-शिंरगाव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0066 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 09/03/2026 16:58

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिंनाक पासून):** 16/01/2026
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 16/01/2026
**Time From (वेळेपासून):** 16:18 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:13 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 09/03/2026 **Time (वेळ):** 16:47 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 012
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 09/03/2026 16:47 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** गोकुळ शिरगाव पोलीस ठाणे ,करवीर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** उज्वला मारूती भडकमकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबधक विभाग,कोल्हापूर,गोकुळ-शिंरगाव, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबधक विभाग,कोल्हापूर,गोकुळ-शिंरगाव, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8446153029

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | एजाज महंमद शेख | | | 1. पोलीस शिपाई बनं1541, गोकुळ शिरगाव पोलीस ठाणे,, गोकुळ-शिंरगाव,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | नितेश मारूती कांबळे | | | 1. पोलीस हेड कन्स्टेबल,, बनं1748,,गोकुळ शिरगाव पोलीस ठाणे,गोकुळ-शिंरगाव, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)** (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिंनाक - 09/03/2026

मी उज्वला मारूती भडकमकर वय 38 -वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 8446153029 समक्ष गोकुळ शिरगाव पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देते की,

मी दिंनाक 16/01/2026 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात हजर असताना मला राजेंद्र सानप, पोलीस निरीक्षक, अतिरिक्त कार्यभार पोलीस उपअधीक्षक ला.प्र.वि.कोल्हापूर यांनी 14.00 वा चे सुमारास बोलावुन घेवुन, समक्ष हजर असले तक्रारदार कृष्णात श्रीपती दामुगडे, वय 44- वर्षे, व्यवसाय - डॉक्टर (इलेक्ट्रो होमिओपॅथी),रा. तामगांव, ता.करवीर, जि. कोल्हापूर यांची ओळख करून देवुन, त्यांची लाचे संदर्भात तक्रार असल्याचे सांगितले. त्यांचे तक्रारीवर कारवाई करणेसाठी पंच उपलब्ध करुन घेणेस व आम्हास पुढील कारवाई करणेबाबतचा मुखशील आदेश दिला. त्यावेळी आम्ही सदर तक्रारदार यांना तक्रार विचारली असता, त्यांनी तक्रारीची हकिकत सांगितली की, मी कुटूंबियासह वरील पत्यावर राहणेस आहे. माझे राहते घराजवळ माझा श्री क्लिनीक नावाचा दवाखाना आहे. मी तामगाव, ता. करवीर, जि.कोल्हापूर येथे गट नंबर 512 मध्ये 1 गुंठा क्षेत्र दिंनाक 29/03/2022 रोजी प्रकाश सुभाष चौगले यांचेकडुन खरेदी केले असुन,सदर जागी मी सिमेंट विटाची खोली बांधली असुन, तेथे मी माझे वरील क्लिनीक सुरू केले आहे. मी वरील खरेदी केलेली जागा ही गौतम सहकारी गृहर्निमाण संस्था मर्यादित तामगाव यांच्या अखत्यारीत येत असलेबाबत, तसेच मी खरेदी केलेला प्लॉट हा घरे बांधुन राहण्यासाठी असुन, तुम्ही त्याचा वापर व्यवसायासाठी करीत आहे. तरी व्यवासायीक वापर थांबवावा अन्यथा तुमच्याविरूध्द योग्य ती कायदेशिर कारवाई केली जाईल, अशा मजकुरची नोटीस संस्थेने मला दिंनाक 27/10/2025 रोजी पाठविली होती. त्यावेळी मी त्यांना तुमचे संस्थेचे नाव कोठेहि मी खरेदी केलेल्या 7/12 उता-यावर नाही.तसेच मी जागा खरेदी करताना वर्तमान पत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द केली होती,त्यावेळी कोणाचीही हरकत आली नसल्याचे सांगितले होते.

दिंनाक 13/01/2026 रोजी संध्याकाळी 04.00 वा चे सुमारास मला गोकुळ शिरगाव पोलीस ठाणेतील नितेश कांबळे यांनी पोलीस ठाणेत बोलावुन घेतले. त्यांनी मला सांगितले की, गौतम सहकारी गृहर्निमाण संस्था मर्यादित तामगाव यांनी माझेविरूध्द वरील गट नंबर 512 मधील जागा फसवणुक करून, खरेदी केलेबाबत तक्रारी अर्ज आला आहे, असे सांगितले. त्यावेळी मी कांबळे साहेबांनी मी कायदेशिर जागा खरेदी केलेबाबतची कागदपत्रे दाखविली. त्यानंतर कांबळे साहेब हे मला सहायक पोलीस निरीक्षक मगदुम मॅडम यांचेकडे घेवुन गेले. त्यांनाही मी वरीलप्रमाणे कागदपत्रे दाखविली. त्यावेळी त्यांनी मला मी दाखविलेली कागदपत्रे ही खोटी आहेत, तुमच्यावर गुन्हा नोंद होवु शकतो. असे म्हणुन मला त्या दिवशी रात्री 10.00 वा पर्यंत पोलीस ठाणेत बसवुन ठेवले. त्यानंतर मला कांबळे साहेबांनी दिंनाक 14/01/2026 रोजी 11.00 वाजता परत पोलीस ठाण्यात बोलविले. त्या दिवशी मी 11.00 वा चे सुमारास कांबळे साहेबांना जावुन भेटलो, त्यांनी मला पोलीस ठाणेचे अवारात थांबणेस सांगितले. त्याप्रमाणे मला सकाळी 11.00 वा ते रात्री 09.30 वा पर्यंत थांबवुन ठेवले. त्यानंतरही कांबळे साहेबांनी मला दिंनाक 15/01/2026 रोजी 11.00 वा येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी 11.00 वाजता हजर झालो.

तेंव्हाही कांबळे साहेबांनी दिवसभर थांबवुन ठेवले. त्यानंतर सायंकाळी 07.00 वा चे सुमारास कांबळे साहेबांनी मला बोलावुन घेतले व मगदुम मॅडमसमोर उभे केले. मगदुम मॅडम यांनी मला तुमची सर्व कागदपत्रे बनावट असुन, त्याबाबत तुमच्यावर गुन्हा दाखल करणार आहे असे म्हणाल्या. त्यावेळी मी त्यांना मी खरेदी केलेली कागदपत्रे कायदेशिर असलेबाबत सांगितले. त्यावेळी कांबळे यांनी मला तु आम्हाला शिकवतोयस काय, कागद बनावट आहेत. त्यामुळे तुझ्यावर गुन्हा दाखल होणारच असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना कागदपत्रे बरोबर आहेत, मदत करा असे म्हणालो. त्यावेळी मगदुम मॅडम यांनी मदत करतो, पण त्याकरीता पैसे दयावे लागतील असे म्हणाल्या. त्यावेळी मी किती म्हणुन विचारले असता, त्यांनी मला बाहेर थांबा कांबळे तुम्हाला सांगतील असे म्हणाल्या. त्यानंतर मी बाहेर थांबलो, काही वेळाने कांबळे पोलीस व त्यांचे सोबत शेख नावाचे पोलीस असे माझेकडे आले. त्यावेळी शेख पोलीस यांचेसमोरच पोलीस नितेश कांबळे यांनी मला, मॅडम यांनी अर्जात माझेवर जर गुन्हा दाखल करावयाचा नसेल तर व अर्जात मदत करतो त्याकरीता 7,00,000/- रूपये (सात लाख रूपये) दयावे लागतील असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना ऐवढे पैसे जास्त होतात काहीतरी कमी करा, असे सांगितले असता, तेंव्हा त्यांनी पैसे कमी करण्यास नकार दिला. त्यावेळी मी त्यांना एक-दोन दिवस मुदत दया, पैशाची जुळणा झालेनंतर भेटतो असे सांगुन निघुन आलो आहे. गोकुळ शिरगाव पोलीस ठाणेमधील सहायक पोलीस निरीक्षक मगदुम मॅडम व पोलीस कर्मचारी नितेश कांबळे माझेकडे मागणी करीत असलेले 7,00,000/- रूपये (सात लाख रूपये) हे लाच म्हणुन मागणी करीत असलेची माझी खात्री झाली आहे. परंतु त्यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेची माझी इच्छा नाही. तरी त्यांचेवर कारवाई करावी, म्हणुन तक्रार सांगुन तक्रारी अर्ज दिला. त्यावेळी तक्रारदार दामुगडे यांनी ते मगदुम मॅडम व पोलीस कर्मचारी नितेश कांबळे यांना दिनाक 16/01/2026 रोजी सायंकाळी 04.30 वा चे सुमारास भेट घेणेस जाणार असलेचे सांगितले. त्यानंतर मी लागलीच मा.नगरभूमापन अधिकारी नगरभुमापन कार्यालय, कोल्हापूर, यांचे कार्यालयातुन लेखी रिपोर्टने शासकीय पंच बोलावुन घेतले. शासकीय पंच आलेनंतर आम्ही कार्यालयातील सापळा पथकातील अमंलदार बोलावुन घेतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार दामुगडे यांची पंचाशी व सापळा पथकातील अमंलदार यांचेशी ओळख करुन दिली. माझे सुचनेवरून तक्रारदार दामुगडे यांनी त्यांची तक्रार पंचाना सांगितली. दामुगडे यांनी तोंडी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. त्यावेळी मी पुढील कारवाई अॅन्टी करप्शन ब्युरोचे ऑफीसमधुन करण्याचे आहे असे सांगुन, तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार दामुगडे व पंच नं.01 शिरढोणे यांचेसह सर्वप्रथम गोकुळ शिंरगाव पोलीस ठाणे येथील सहा.पोलीस निरीक्षक मगदुम मॅडम, पोलीस कांबळे व पोलीस शेख हे तक्रारदार यांचेकडे लाच मागणी करतात, अगर कसे याची पडताळणी करणार आहोत. पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या तसेच शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये झक्ड कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकॉर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची दामुगडे व पंचाची खात्री करून दिली. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर पडताळणीचे अनुषंगाने तक्रारदार दामुगडे व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 16.18 वाजता चालु करून, तो तक्रारदार दामुगडे यांचे गळयात काळया दो-याच्या साहयाने अडकवुन, दामुगडे व पंच नं.1 सुर्यकांत शिरढोणे यांना तक्रारदार यांची हिरो होंडा शाईन मोटार सायकल नं. एमएच 09 एफ.आर. 3344 वरून गोकुळ शिरगाव पोलीस ठाणे येथे सहा.पोलीस निरीक्षक मगदुम मॅडम, पोलीस कांबळे व पोलीस शेख यांची भेट घेणेकरीता पाठविले. त्यावेळी आम्ही,सापळा पथक व पंच नं.02 प्रविणसिंह पाटील ऑफीसमध्ये थांबुन राहीलो. तक्रारदार दामुगडे व पंच नं.1 शिरढोणे असे काहीवेळाने अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 18.13 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 सुर्यकांत शिरढोणे यांना तुम्ही तक्रारदार यांचेसोबत गोकुळ शिंरगाव पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे सहा.पोलीस निरीक्षक मगदुम मॅडम, पोलीस कांबळे व पोलीस शेख यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले, याबाबत विचारले असता, तक्रारदार दामुगडे यांनी गोकुळ शिरगाव पोलीस ठाणेत जावुन कांबळे साहेब यांचेबाबत एका महिलेला माहिती विचारली असता, त्यांनी ते बाहेर कोठेतरी असतील फोन करा, असे म्हणाल्या. त्यावेळी तक्रारदार यांनी नाही ओ, शेख साहेबांचा पण सांगा असे म्हणाले. त्यावेळी त्या महिलेने इजाज शेख यांचा 9881191541 हा नंबर दिला. त्यानंतर दामुगडे यांनी त्यांचे मो.नं.7304979292 वरून पोलीस शेख यांना फोन लावला. त्यावेळी शेख हे पाच मिनटात येतो असे म्हणाले. त्यानंतर काही वेळाने शेख साहेब दामुगडे यांना येवुन भेटले. त्यावेळी दामुगडे यांनी कांबळे साहेब नाहीत का म्हणुन विचारले असता, शेख यांनी येणार आहेत पाच मिनीटात, असे म्हणुन कोठेतरी निघुन गेले. त्यानंतर तेथे कांबळे साहेब आले. त्यावेळी दामुगडे यांनी शेख यांना परत फोन लावुन कांबळे साहेब आल्याचे सांगितले. त्यावेळी तक्रारदार दामुगडे,पोलीस कांबळे व पोलीस शेख असे एकत्र आले व त्यांचेत तक्रादार दामुगडे यांचेविरूध्द आले अर्जाचे तसेच जो विवादीत प्लॉट आहे

त्या अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी पोलीस कांबळे नाय-नाय अर्जदार कुठंल्या बेसवर थांबणार, त्यावर तुमचं भविष्य ठरणार..यावर तुमचं भविष्य डिपेंड आहे असे म्हणाले. त्यावेळी दामुगडे साहेब तुमच्या लक्षात आलं नाही. मॅडम काल म्हटल्याना गुन्हा नोंद करत नाही, हे आमच्या हातात हाय काल बोलल्या ना इजाज सराच्या समोर ते असे म्हणाले. त्यावेळी कांबळे झालं असेल बोलणं मला काय कल्पना नाही, मी विचारतो असे म्हणाले. त्यावेळी दामुगडे मग बोलवा की त्या बाहेर दोन मिनीटं. तुम्ही आला की तेन्ही जाता तेन्ही आला की तुम्ही जातात शेख साहेब यात काय तरी मार्ग काढायचं बघा असे म्हणाले. त्यावेळी पोलीस शेख काय करायचं, सांगा असे म्हणाले. त्यावेळी दामुगडे काय करायचं साईटला या जरा इकडं असे म्हणाले. त्यावेळी पोलीस शेख काय करायच असे म्हणाले. त्यावेळी दामुगडे "काय मार्ग म्हणजे जी अमाउंट सांगितली त्यात कमी आहे का सांगा ती" असे म्हणाले. त्यावेळी शेख ते मला पण वाटतयं सोडा असे म्हणाले. त्यावेळी दामुगडे "किती सांगितले बघा, ७ लाख रुपये कमवायला किती वेळ लागतो साहेब सांगा ?" असे म्हणाले. त्यानंतर "पोलीस शेख तुमचं सांगा, मला तिंथ जावून बोलायला" असे म्हणाले. त्यावेळी दामुगडे "तुम्ही सांगितलेल्या पध्दतीने थोडी फार जोडणा माझी झालीया. एक दोन लाखाची जोडणा झालीया, काय कमी करतात काय मॅडम, जरा फक्त तुमच्याकडून जेवढं कमी, प्लिज जरा रिक्वेस्ट करून कमी किती करत्यात तेवढं बघा आणि सांगा मला" असे म्हणाले. त्यानंतर ते दोघे कांबळे साहेब होते त्या ठिकाणी आले. त्यावेळी त्यांचेत पु्न्हा प्लॉटचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी तक्रारदार दामुगडे प्लॉट द्यायलाच लागणार असे कांबळे यांना विचारले. त्यावेळी कांबळे at any cost द्यायला लागणार. हे बघा आम्ही जे सांगतोय तो असा हा मार्ग आहे असे म्हणाले. त्यावेळी दामुगडे बरोबर आहे असे म्हणाले. त्यावेळी पोलीस कांबळे हे होवून दयावा लागणार, हा पण मार्ग हाय असे म्हणाले. त्यावेळी दामुगडे साहेब मी काय म्हणतोय, पैसे तर द्यायला लागणार ना? मग प्लॉट पण जाणार आणि पैसे पण द्यायला लागणार, तर मग मला यात काय फायदा सांगा? असे म्हणाले. त्यावेळी पोलीस कांबळे तुम्हाला एकच फायदा आहे की गोड बोलून त्या कोण तो तुम्ही चौगुलेकडून हळूहळू पैसे काढून घ्या.. असे म्हणाले. त्यानंतर त्यांचेत चौगुले यांचे व संस्थेच्या अनुषंगाने बोलने झाले. तक्रारदार दामुगडे "तो प्लॉट दिला की, इथं किती कमी होणार काय पैशांच.." असे म्हणाले. त्यावेळी पोलीस कांबळे "ते काय बोलून घेतो पैशांच घेतो विचारून, मी त्याला बोलतो कुठल्या परिस्थितीत..." असे म्हणाले. त्यानंतर पुन्हा त्यांचेत प्लॉटचे अनुषंगाने बोलणे झाले. त्यावेळी दामुगडे ऐका की, झालं ते नुकसान आणि रिंटन केल तर ते पण नुकसान मध्ये हाय, इथं 7 लाख रूपये कमी हाय काय अमाउंट जरा कमी केलं तर , मी रिक्वेस्ट करू का मॅडमाना दोन मिनीटं बोलू जरा.. असे म्हणाले. त्यावेळी पोलीस शेख "तुम्हाला जावा म्हणतील घरला..." असे म्हणाले. त्यावेळी दामुगडे, मग तुम्ही बोलून बघा प्लिज जरा सांगा.. असे म्हणाले. त्यावेळी पोलीस कांबळे पण ते तुम्ही तयार ठेवा, मला दयायला लागणार, व्हय नी प्लॉट दयायला लावणार हे डोक्यात ठेवा... असे म्हणाले. त्यानंतर दामुगडे व पोलीस शेख यांचेत तक्रारी अर्जाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यानंतर दामुगडे मी खरोखर रिक्वेट करू का मॅडमना.. असे म्हणाले. त्यावेळी पोलीस शेख पैशाचा विषय बोलणार नाहीत तुमच्याशी.. असे म्हणाले. त्यावेळी दामुगडे तुम्ही बोलून या मग त्याचेशी मग सांगा.... असे म्हणाले. त्यावेळी पोलीस शेख मी सांगितलेला निरोप सांगितलाय,तुम्ही म्हणालाय ऐवढं ते तिंथ काय मी सांगू शकत नाही...असे म्हणाले. त्यावेळी दामुगडे किती सांगितलाय असे म्हणाले. त्यावेळी पोलीस शेख दोन लाख असे म्हणाले. त्यावेळी दामुगडे "दोनची तयारी झालीया ओ, म्हणजे मला सात मध्ये कमी किती होईल सांगिंतल ना, मला तिन ते चार दिवसाची मुदत पाहिजे .."असे म्हणाले. त्यावेळी पोलीस शेख "तस नाही होत ते" असे म्हणाले. त्यावेळी दामुगडे यांना पोलीस शेख "तुमचा फायनल आकडा सांगा मला किती होवू शकतयं.." असे विचारले त्यावेळी दामुगडे यांनी "पाच पर्यंत करू शकतोय, त्याचा आत करा. परंतु पाच पर्यंत, तुमच्या हेणं जेवढं होईल तेवढं मॅनेज करा, पण मला मंगळवार बुधवार दिला पाहिजे..." असे म्हणाले. त्यानंतर त्यांचेत पुन्हा कधी यायचे,तसेच पोलीस शेख यांनी यात त्यांचा काय रोल नाही आहे. ते मॅडम आणि कांबळे साहेबाचं प्रकरण हाय असे म्हणाले. त्यावेळी पोलीस शेख "पाच पर्यंत.."असे विचारले त्यावेळी दामुगडे यांनी "त्याचे आत करा की, म्हणजे शेवट नाही म्हटले तर, करून टाका की, पर्याय नाही त्याला.." असे म्हणाले. त्यावेळी पोलीस शेख "चार सांगतो.." असे म्हणाले. त्यावेळी दामुगडे "चार सांगा. नाही म्हटले तर वाढवा..." असे म्हणाले. त्यावेळी पोलीस शेख "पाच..." असे म्हणाले. त्यानंतर त्यांचेत दामुगडे यांचे दवाखाना व पेंशट यांचे अनु्षंगाने बोलने झाले. त्यावेळी पोलीस शेख यांनी पोलीस कांबळे यांना बुधवार पर्यंत वेळ पाहिजे, त्यांना त्या अर्जदारला जरा उदया... असे म्हणाले. त्यावेळी पोलीस कांबळे तो उदया येणार, इजाज ऐक उदया येणार तो, ते फाइनल ते ठरवूनचं तो येणार, आपण कसं त्याला बोलूपण शकत नाही.त्याला काल पण वेळ मागूण घेतली. त्या अगोदर त्याना दोन दिवस वेळ दिला आपण, आणि कसा वेळ देणार... असे म्हणाले. त्यावेळी एक दिवस तर ढकला मग मंगळवार पर्यंत.. मंगळवार पर्यंत रिक्वेस्ट करून,रविवारी झालं तर रविवारी देतो. माझेकडं दोनची तयार हाय, मामाच्या मुलग्याला बोलवून घेतलयं... असे म्हणाले. त्यावेळी पोलीस कांबळे आता सांगिंतल ना, तो विषय आपला नव्हे,

त्याना उदया त्याची गाठ घालून दयायची...असे म्हणाले. त्यानंतर दामुगडे पोलीस कांबळे व पोलीस शेख यांचेत कधी पोलीस ठाणेस यायचे, या अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी तक्रारदार दामुगडे यांनी "ओके पेमेंटचं मला काय सांगा" असे पोलीस शेख व कांबळे यांना विचारले त्यावेळी पोलीस शेख "चर्चा करून सांगतो मी उदया... " असे म्हणाले. त्यावेळी पोलीस कांबळे ही "विचारून सांगतो..." असे म्हणाले. त्यावेळी दामुगडे "चार चारचं करा शक्यतो वाढवू नका..." असे म्हणाले. त्यावेळी पोलीस कांबळे "तो दुपारी आला की, तुम्हाला फोन करतो, तुम्ही या..." असे म्हणाले. त्यावेळी पोलीस शेख "तुम्ही आला की फिक्स करूया..." असे म्हणाले. त्यावेळी पोलीस कांबळे "पहिंल तुमची तुमची हे ..." असे म्हणाले. त्यावेळी दामुगडे "सात लाख रूपये नव्हे, साहेब माझं ऐका... " असे म्हणाले. त्यावेळी पोलीस शेख "बघुया बोलतो मी.." असे म्हणाले. त्यावेळी दामुगडे हे चार लाखावर मिटवा असे म्हणाले त्यानंतर मी व तक्रारदार दामुगडे असे परत आलो आहे अशी हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार दामुगडे यांना गोकुळ शिरगाव पोलीस ठाणे येथे मगदुम मॅडम, पोलीस कांबळे व शेख यांना भेटण्यास गेले नंतर काय हकीकत घडली याबाबत विचारले असता त्यांनी पंच नं. 1 शिरढोणे यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमधील तक्रारदार दामुगडे पोलीस कांबळे व पोलीस शेख यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण दोन्ही पंच व तक्रारदार दामुगडे यांचेसमक्ष ऐकले. यावरून तक्रारदार दामुगडे व पोलीस कांबळे व पोलीस शेख यांची भेट होवुन त्यांच्यामध्ये तक्रारदार दामुगडे यांच्याविरूध्द गोकुळ षिंरगाव पोलीस ठाणे येथे तक्रारदार यांच्या प्लॉट खरेदीबाबत असले तक्रार अर्जाबाबत बोलणे झाले. त्यामध्ये तक्रारदार यांचेविरूध्द तक्रारी अर्जावरून फसवणुकीचा गुन्हा दाखल न करण्याकरीता पोलीस एजाज शेख यांनी सहा.पोलीस निरीक्षक मगदुम मॅडम व पोलीस कांबळे यांच्याकरीता पंचासमक्ष 7,00,000/-रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती 4,00,000/-रू लाचेची मागणी करून लाच रक्कम सोमवार किंवा मंगळवार पर्यंत देण्यास सांगितलेचे निष्पन्न झाले. तसेच तक्रारदार दामुगडे यांनी ओके पेमेंटचं मला काय सांगा असे म्हणाले असता पोलीस कांबळे विचारून सांगतो... असे म्हणाले आहेत. तसेच तक्रारदार दामुगडे "तो प्लॉट दिला की, इथं किती कमी होणार काय पैशांचं..." असे म्हणाले त्यावेळी पोलीस कांबळे "ते काय बोलून घेतो पैशांच घेतो विचारून," मी त्याला बोलतो कुठल्या परिस्थितीत.. असे म्हणाले आहेत यावरून पोलीस कांबळे हे पोलीस शेख तक्रारदार यांचेकडे मागणी करीत असलेल्या लाचेस प्रोत्साहन देत असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच तक्रारदार हे सहा.पोलीस निरीक्षक मगदुम मॅडम यांच्याकडे चला मी त्यांना विंनती करतो असे म्हणाले, त्यावेळी पोलीस शेख यांनी मॅडम तुम्हाला जावा म्हणतील घरला, असे म्हणुन तक्रारदार यांना सहा.पोलीस निरीक्षक मगदुम मॅडम यांच्याकडे जावु न दिल्याचे व तक्रारदार हे पैशांची जुळणा झाली की मंगळवार किंवा बुधवारी येतो असे म्हणालेचे, निष्पन्न झाले. तक्रारदार दामुगडे यांना पैसे घेवुन मंगळवार किंवा बुधवारी बोलविले असल्याने, पुढील कारवाई तक्रारदार दामुगडे यांना पोलीस शेख किंवा कांबळे यांचा फोन आलेनंतर किंवा ते कधी बोलवणार आहेत त्या दिवशी करण्याचे ठरवुन, चालु कारवाई तात्पुरती स्थगित केली.

दिनाक 21/01/2026 रोजी आम्ही कार्यालयात हजर असताना, आम्हास तक्रारदार दामुगडे यांनी फोन करून सांगितले की, गोकुळ शिंरगाव पोलीस ठाणेच्या सहा.पोलीस निरीक्षक मगदुम मॅडम यांनी त्यांना त्यांचे दवाखान्याचे कागदपत्रे घेवुन पोलीस ठाणेस बोलाविले असुन, त्यावेळी त्यांचे◌े सोबत पैशांची बोलणी करण्याची शक्यता आहे, असे सांगितल्याने आम्ही दिंनाक 21/01/2026 रोजी गोकुळ शिरगाव पोलीस ठाणेच्या सहायक पोलीस निरीक्षक मगदुम मॅडम यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी कारवाईवेळी तक्रारदार दामुगडे व सहा. पोलीस निरीक्षक मगदुम मॅडम, पोलीस कांबळे व पोलीस शेख यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण दोन्ही पंच व तक्रारदार दामुगडे यांचेसमक्ष ऐकले. यावरून तक्रारदार, सहा.पोलीस निरीक्षक मगदुम मॅडम यांची भेट होवून त्यांच्यामध्ये तक्रारदार दामुगडे यांच्याविरूध्द गोकुळ षिंरगाव पोलीस ठाणे येथे तक्रारदार यांच्या दवाखान्याच्या कागदपत्रांबाबत बोलणे झाले, त्यावेळी तक्रारदार यांनी 'चालेलं ....शेख साहेब आणि कांबळे साहेबांनी... त्या काय बोलला होता का त्यांना...' अशी विचारणा केल्यावर मगदुम मॅडम यांनी 'इथं सगळी कायदेशीर काम होतात आमच्या कडणं इथं सगळ्याना सक्त ताकीद आहे तशी आमची कळालं तुम्ही मागितलेली डॉक्युमेंट तेवढी दया ठाणे अंमलदारकडं...' असे म्हणून तक्रारदार यांना ठाणे अंमलदार यांच्याकडे कागदपत्रे जमा करण्यास सांगितलेचे निष्पन्न झाले. तसेच त्यावेळी पोलीस शेख यांची भेट झाली परंतू, त्यांनीही तक्रारदार यांच्यासोबत दिंनाक 16/01/2026 रोजी जे पैशांबाबत बोलणे झाले, त्यावर बोलणे टाळून, 'ते मॅडम बोलतील तेच आमचं. काय नाय माझा काय विषय नाही...' असे सांगितले, तसेच पोलीस कांबळे हे ही तक्रारदारना भेटले परंतु,ते त्यांच्यासोबत पैशांबाबत काहीही बोलले नसल्याचे◌े निष्पन्न झाले. त्यानंतर सदर दिवशीची कारवाई तात्पुरती स्थगित करून, ज्यावेळी पोलीस शेख किंवा कांबळे यांचा तक्रारदार यांना मागणी केलेली लाच रक्कम घेवुन ये,म्हणुन निरोप किंवा फोन येईल त्यावेळी

पुढील कारवाई करण्याचे ठरवुन, चालु कारवाई तात्पुरती स्थगित केली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार दामुगडे यांचे नियीमत संपर्कात राहुन, त्यांना सहा.पोलीस निरीक्षक मगदुम मॅडम, पोलीस कांबळे व पोलीस शेख यांचेकडुन काही निरोप आला आहे का, याबाबत माहिती घेत होतो. परंतु त्यांचा पडताळणी कारवाई झालेपासुन काही निरोप आला नसल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही दिंनाक 13/02/2026 रोजी तक्रारदार दामुगडे यांचा जबाब घेतला असता, त्यांनी दिंनाक 16/01/2026 रोजी व दिंनाक 21/01/2026 रोजी केले पडताळणी कारवाईप्रमाणे हकीकत सांगितली. तसेच सहा.पोलीस निरीक्षक मगदुम मॅडम, पोलीस कांबळे व पोलीस शेख यांना त्यांच्यावर संशय आला आहे, त्यामुळे पोलीस एजाज शेख व पोलीस कांबळे यांनी यापुर्वी तडजोडीअंती मागणी केलेले 4,00,000/-रू तक्रारदार दामुगडे यांच्याकडून स्विकारतील असे त्यांना वाटत नाही. तरी पुढील कायदेशिर कारवाई करावी म्हणुन सविस्तर जबाब नोंदवण्यात आला आहे.

यातील मुळ तक्रारदार कृष्णात श्रीपती दामुगडे यांचेविरूध्द गोकुळ शिरगाव पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे अर्ज आला असुन, सदर अर्जाच्या चौकशीमध्ये तक्रारदार दामुगडे यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल न करण्याकरीता गोकुळ शिरगाव पोलीस ठाणेच्या सहा.पोलीस निरीक्षक मगदुम मॅडम यांच्याकरीता पोलीस एजाज शेख यांनी तक्रारदार यांच्याकडे बेकायदेशिरपणे 7,00,000/-रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती 4,00,000 /-रू लाचेची मागणी करून लाच रक्कम पुढील मंगळवार किंवा बुधवार पर्यत घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. तसेच मुळ तक्रारदार दामुगडे यांचे काम पोलीस कांबळे यांचेशी संबधीत असल्याने ते पोलीस एजाज शेख यांनी तक्रारदार दामुगडे यांच्याकडे लाच मागणी केली आहे त्यावेळी तेथे समक्ष उपस्थित राहुन लाच मागणीस बेकायदेशिरपणे प्रोत्साहन देत असल्याचे निष्पन्न झाले आहे.म्हणुन माझी 01) एजाज महंमद शेख, पोलीस शिपाई ब.नं.1541 नेमणुक गोकुळ शिरगाव पोलीस ठाणे, 02) नितेश मारूती कांबळे, पोलीस हेड कॉन्स्टेबल, ब.नं. 1748, नेमणुक गोकुळ शिरगाव पोलीस ठाणे यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 अ, 12 प्रमाणे फिर्याद आहे.

माझा वरील जबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष हा दिला जबाब स. ता. म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** **(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:** **(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

tabassum jamal magdum(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलिस ठाणे अंमलदार
गोकुळ शिरगांव M.I.D.C. पो.ठाणे
जि.कोल्हापूर

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** tabassum jamal ma(
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**